# प्रकरण पाचवे

## उपसंहार

'उपसंहार' या पाचव्या प्रकरणामध्ये 'साहित्य अकादमी : स्वरूप आणि कार्ये', 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी साहित्य', 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची आशयसूत्रे आणि वैशिष्ट्ये' आणि 'साहित्य अकादमीच्या निकषांच्या आधारे मराठी कादंबऱ्यांचे आकलन' या चारही प्रकरणांचे सिंहावलोकन केलेले आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त संपूर्ण मराठी साहित्य हे मराठी साहित्यातील एक दर्जेदार, अनमोल आणि मौलिक ठेवा आहे. या साहित्यामुळे मराठी साहित्याची सांस्कृतिक आणि वाङ्मयीन उंची निश्चितच वाढलेली आहे. हे साहित्य केवळ मराठी साहित्यालाच नव्हे तर अखिल भारतीय स्तरावरील साहित्यालाच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारे आहे. साहित्य अकादमी ही अखिल भारतीय स्तरावरील स्वायत्त संस्था आहे. साहित्य अकादमीचा पुरस्कार हा अखिल भारतीय स्तरावरील अतिशय प्रतिष्ठेचा आणि सन्मानाचा पुरस्कार समजला जातो. साहित्य अकादमीच्यावतीने गौरविण्यात आलेले हे साहित्य अजरामर आहे.

'साहित्य अकादमी : स्वरूप आणि कार्ये' या पहिल्या प्रकरणात साहित्य अकादमीच्या स्वरूप आणि कार्याविषयीचा धावता आढावा घेतलेला आहे. भारत हा बहुभाषिक देश असल्यामुळे भारताला फार प्राचीन काळापासून सांस्कृतिक आणि साहित्यिक असा समृद्ध वारसा लाभलेला आहे. या विविधतेने नटलेल्या भारतीय भाषांचे वैभव फारच वैविध्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण आहे. प्रांतानुसार आणि गावानुसार बदलत जाणारी भाषा हे जणू काही भारतीयांचे वैशिष्ट्यच आहे. साहित्य अकादमीने हे बहुविध आणि बहुमौलिक साहित्य काळाच्या पडद्याआड जाऊ नये आणि त्यांच्या साहित्याचा इतर भाषेत अनुवाद करणे असे मौलिक कार्य करण्याची जबाबदारी घेतलेली आहे. साहित्य अकादमीचे हे कार्य देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने अतिशय प्रशंसनीय आहे, यात तीळमात्र शंका नाही. साहित्य अकादमीमुळे भारतीय साहित्याला बहर आलेला आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्यामुळे साहित्य अकादमीच्या या बहुआयामी व बहुव्यापी कार्याची आपणाला माहिती व्हावी म्हणून साहित्य अकादमीबद्दलची संपूर्ण इत्यंभूत माहिती या प्रकरणात सादर केलेली आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय साहित्याच्या अभिवृद्धिसाठी जे काही जाणीवपूर्वक व संघटित प्रयत्न केले, त्यामधूनच 'साहित्य अकादमी'ची स्थापना झालेली आहे. भारतातील विविध भाषांच्या विकासासाठी या भाषांतील निरनिराळ्या वाङ्मयीन प्रवृत्ती आणि त्या कार्याद्वारा देशात सांस्कृतिक ऐक्याची प्रगती साधण्यासाठीच साहित्य अकादमीचा जन्म भारत सरकारच्या पुढाकाराने झालेला आहे.प्रादेशिक साहित्याच्या संगोपन व संवर्धनासाठी साहित्य अकादमीची स्थापना दिनांक-१२ मार्च, १९५४

साली करण्यात आलेली आहे. सुरुवातीच्या काळात पंडित नेहरू, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ.झाकिर हुसेन आणि मौलाना आझाद या दूरदृष्टीच्या धुरंधर मंडळीनी साहित्य अकादमीला वैभवाचे दिवस आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून तिच्या कार्याला भक्कम पाठबळ मिळवून दिलेले असल्यामुळेच नंतरच्या काळात मोठ्या जोमाने आणि झपाट्याने साहित्य अकादमीने यशस्वीपणे वाटचाल केलेली आहे.

विविध भाषांतील साहित्यिक, अभ्यासक, विद्वान तज्ज्ञ यांच्या सहभागातून कारभार चालविणाऱ्या साहित्य अकादमीने आपल्या कार्यासाठी देशातील २४ प्रमुख भाषांची निवड केलेली आहे. साहित्य अकादमीने धोरणे आखताना विविध भाषांतील प्राचीन, पारंपरिक साहित्याचे जतन आणि त्यातील संशोधन व अभ्यासाला महत्त्व दिलेले आहे. विविध भाषांतील सौंदर्याविष्कारापुरता दृष्टिकोन न ठेवता विविध भाषक जनसमूहांच्या अस्मितेचे हुंकार, त्यांच्या आशा-आकांक्षा, वेदना, घुसमट, विविधांगी अनुभव, भिन्न दृष्टिकोन आणि जीवनाबद्दलच्या आगळ्या कल्पना परिणामकारकतेने अभिव्यक्त करणाऱ्या विविध भाषातील साहित्याला प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतलेली आहे.

साहित्य अकादमीने मूलभूत ग्रंथांचे प्रकाशन करण्याचा वसा घेतलेला आहे. साहित्य अकादमीचे हे कार्य व्यापक आणि बहुआयामी आहे. भारतातील विविध भाषांमधील साहित्याची जोपासना व संवर्धन करण्यासाठी आणि भिन्न-भिन्न भाषांमधील साहित्यिक व्यवहाराची सांगड घालून सांस्कृतिक ऐक्याचा पुरस्कार साधावा या उद्देशाने साहित्य अकादमीची निर्मिती करण्यात आलेली आहे. साहित्य अकादमीच्या स्थापनेचा मुख्य हेतू भारतीय साहित्याचा प्रचार आणि प्रसार करणे हा आहे. साहित्य अकादमीने सर्वांच्या सोयीसाठी कलकत्ता, बेंगलोर, चेन्नई आणि मुंबई या चार ठिकाणी प्रादेशिक कार्यालयांची स्थापना केलेली आहे. साहित्य अकादमीचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली या ठिकाणी आहे. भारत सरकारने साहित्य अकादमीसाठी स्वतंत्र संविधान बनविलेले आहे. साहित्य अकादमीच्या संबंधीचा प्रस्ताव भारत सरकार शिक्षण मंत्रालय ठराव क्रमांक- एफ ६-४/५/जी.२(ए), दिनांक-१५ डिसेंबर, १९५२ यामध्ये समाविष्ट आहे.

या पहिल्या प्रकरणामध्ये साहित्य अकादमीच्या स्वरूप व कार्याबद्दल सर्वांगीण व परिपूर्ण माहिती सांगितलेली आहे. तसेच साहित्य अकादमीचे सामान्य परिषद आणि कार्यकारी मंडळ यांची रचना, स्वरूप व कार्ये या विषयीही सोदाहरण माहिती दिलेली आहे. साहित्य अकादमीच्यावतीने ज्येष्ठ व श्रेष्ठ लेखकाला सन्मानित करण्यासाठी 'फेलोशिप' ही एक महत्त्वाची योजना आहे. साहित्य अकादमीच्यावतीने भारतीय साहित्यातील मूलभूत संशोधनासाठी 'डॉ.आनंद कुमारस्वामी फेलोशिप', 'प्रेमचंद फेलोशिप' आणि 'लेखकांना प्रवासासाठी दिली जाणारी फेलोशिप' या तीन प्रकारच्या शिष्यवृत्या दिल्या जातात. या तिन्ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यापाठीमागची उद्दिष्ट्ये, नियमावली आणि अटी या संदर्भातील संपूर्ण माहितीही या ठिकाणी विशद केलेली आहे.

साहित्य अकादमीच्यावतीने साहित्य अकादमी पुरस्कार, साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार, भाषा सन्मान पुरस्कार आणि बालसाहित्य पुरस्कार हे पुरस्कार दरवर्षी दिले जातात. या पुरस्काराचे स्वरूप, पुरस्कार निवड प्रक्रिया आणि पुरस्कार पात्रतेचे निकष या संबंधीची सविस्तर माहिती या पहिल्या प्रकरणात सोदाहरण सांगितलेली आहे. या पुरस्कारासाठी आधार सूची तयार करणे आणि भाषा सल्लागार मंडळाच्या सदस्यांची शिफारस प्राप्त करण्याची प्रक्रिया, प्रारंभिक पॅनल व त्यांचे कार्य, ज्युरी (पंच) आणि त्यांचे कार्य आणि साहित्य अकादमीच्या पुरस्काराची घोषणा याबाबतही सखोल व सर्वांगीण माहिती या ठिकाणी थोडक्यात विशद केलेली आहे.

भारतीय साहित्यिकांनी भाषा आणि लिपीच्या मर्यादा ओलांडून एकत्र यावे आणि भारतीय लेखकांनी या देशाचा समृद्ध साहित्यिक वारसा किंवा भारतीय साहित्यिक परंपरेच्या अपार विविधतेचा आणि अनेकविधतेचा अधिकाधिक रसास्वाद घ्यावा, या उद्देशाने साहित्य अकादमीच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन दरवर्षी केले जाते. उदाहरणार्थ- संवत्सर व्याख्यान, चर्चासत्रे, लेखकांच्या भेटी, कवि-अनुवादक, व्यक्ती आणि पुस्तके, माझ्या दृष्टिकोनातून, संवाद, मुलाखत, अस्मिता, आविष्कार, अंतराळ, लोकविविध स्वर, कविसंधी, कथासंधी इत्यादी साहित्य अकादमीच्या विविध उपक्रमांबद्दल थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

साहित्य अकादमीने भारतीय साहित्याच्या अभिवृद्धीसाठी अनेक प्रकल्प व परियोजना राबिवलेल्या आहेत. साहित्य अकादमीने जनजातीय आणि मौखिक साहित्य प्रकल्प, भारतीय साहित्याचे अभिलेखन आणि साहित्य अनुवाद केंद्र हे तिन्ही प्रकल्प यशस्वीपणे राबविलेले आहेत. यात तिन्ही प्रकल्पांचा थोडक्यात मागोवा याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्य अकादमीने भारतीय साहित्याच्या विकासासाठी राबविलेल्या 'एनसायक्लोपिडिया ऑफ इंडियन पोएटिक्स', 'नवोदय योजना', 'राष्ट्रीय अनु-वाद संदर्भ ग्रंथसूची', 'साहित्य अकादमीची ग्रंथमालिका' आणि 'भारतीय साहित्याचा इतिहास' या योजनां-चाही थोडक्यात परिचय करून दिलेला आहे.

भाषा प्रचाराला व उत्तम दर्जाच्या साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि विविध भाषांमध्ये साहित्याचे आदान-प्रदान सुकर करण्याच्या दृष्टीने सन १९५७ मध्ये 'इंडियन लिटरेचर' हे द्वैमासिक तर सन १९८० सालापासून 'समकालीन भारतीय साहित्य' हे हिंदी द्वैमासिक सुरु केलेले आहे. याव्यतिरिक्त सन १९५६ सालापासून साहित्य अकादमीने 'संस्कृत प्रतिभा' हे संस्कृत भाषेतील अर्धवार्षिकही नियमितपणे सुरु केलेले आहे. साहित्य अकादमीच्यावतीने नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या या तिन्ही नियतकालिकांचा मागोवा या प्रकरणात घेतलेला आहे.

साहित्य अकादमीने आजमितीस अनेकविध महत्त्वाच्या ग्रंथांचे प्रकाशन केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अशोकावदन, बंकिमचंद्र चॅटर्जी :एस्सेज इन पर्सपेक्टिव्ह, भारतीय साहित्य संदर्भ ग्रंथसूची, क्रिटिकल इन्व्हेंटरी ऑफ द रामायण, कालिदासाच्या कार्याचे समीक्षात्मक संस्करण, मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या कार्याचे संकलन, समकालीन भारतीय साहित्य, शब्दकोश, इंडियन लिटरेचर सिंस इंडिपेंडन्स, मेकिंग ऑफ इंडियन लिटरेचर, राजतरंगिणी, रामायण ट्रॅडिशन इन आशिया, नॅशनल रजिस्टर ऑफ ट्रांसलेटर्स, श्री ज्ञानदेव : अमृतानुभव (मराठी गौरवग्रंथ), अनुवाद संदर्भ ग्रंथसूची, हूज हू ऑफ संस्कृत स्कॉलर्स इन इंडिया, भारतीय लेखकांचा परिचय, भारतीय साहित्याचे संकलन इत्यादी साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या महत्त्वपूर्ण ग्रंथांबद्दल थोडक्यात माहिती सांगितलेली आहे.

साहित्य अकादमीचे ग्रंथालय हे भारतातील प्रमुख बहुभाषिक ग्रंथालयापैकी एक महत्त्वाचे ग्रंथालय आहे. साहित्य अकादमीकडून मान्यता मिळालेल्या २४ भाषेतील अनेकविध पुस्तकांचा भव्य-दिव्य असा संग्रह या ग्रंथालयात पहावयास मिळतो. या ग्रंथालयाचे स्वरूप व कार्ये, नियमावली आणि ग्रंथालयासंबंधीची इतर अनुषंगिक माहिती सविस्तरपणे याच प्रकरणात शब्दांकित केलेली आहे.

याशिवाय साहित्य अकादमीची गरज, महत्त्व, वेगळेपण आणि योगदान याबद्दलही थोडक्यात माहिती याच प्रकरणात विशद केलेली आहे. साहित्य अकादमीमुळे अखिल भारतीय स्तरावर मराठी साहित्याची व्यापकता आणि श्रेष्ठता तपासण्यास मदत झालेली आहे. साहित्य अकादमीमुळे एकूणच भारतीय साहित्याच्या वाङ्मयीन विकासाला चालना मिळालेली आहे. साहित्य अकादमीने साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची भर घालून राष्ट्रीय ऐक्याचे महान कार्य केलेले आहे. ६० वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात तिने आपल्या संकल्पित कार्याची मुहूर्तमेढ भक्कमपणे रोवलेली आहे. तिच्या बहुआयामी कार्यामुळेच देशाची साहित्यिक व सांस्कृतिक एकता, एकात्मता टिकलेली आहे.

आंतरराष्ट्रीय आणि वैश्विक पातळीवर भारतीय साहित्याची मुद्रा उमटविण्याचे काम साहित्य अकादमीने केलेले आहे. पुरस्कार निवडीबाबतची पारदर्शकता हे साहित्य अकादमीचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय साहित्याचा जगभर प्रचार आणि प्रसार करण्यामध्ये तिचे योगदान अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. भारतासारख्या बहुभाषिक देशात साहित्याच्या आदान-प्रदानाला साहित्य अकादमीने मोठा हातभार लावलेला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त व्यक्तींची व कलाकृतींची निवड ही लोकादरास व प्रशंसेस पात्र ठरलेली आहे. पारितोषिके, ग्रंथनिर्मिती आणि प्रकाशने हा साहित्य अकादमीच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. साहित्य अकादमीमुळेच प्रादेशिक भाषेतील उत्तमोत्तम साहित्यकृती इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्ये अनुवादित होऊन सर्वदूर पोहोचलेल्या आहेत. या साहित्य अकादमीबद्दलची सर्वांगीण व परिपूर्ण माहिती या पहिल्या प्रकरणामध्ये मांडलेली आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी साहित्य' या दुसऱ्या प्रकरणात साहित्य अकादमीने इ.स. १९५५ ते इ.स. २००७ पर्यंत गौरविलेल्या ५७ ग्रंथांचा साधार अल्पपरिचय करून दिलेला आहे. या संपूर्ण साहित्याचा समग्र आणि सखोलपणे एकत्रित अभ्यास करणे ही अतिशय अवघड आणि आवाक्याबाहेरील गोष्ट आहे याची मला पूर्णतः जाणीव असल्यामुळे त्यांचा संक्षिप्त आढावा या प्रकरणात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्वच कलाकृती त्या-त्या वर्षातील दर्जेदार आणि मौलिक कलाकृती आहेत. ती मधील आशयविश्व आणि आविष्कारशैलीदेखील अतिशय नाविन्यपूर्ण आहेत. या कलाकृती त्या वाङ्मयप्रकारातील मैलाचा दगड ठरणाऱ्या आहेत. त्यांचे सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास संपूर्ण मराठी साहित्याचा वाङ्मय इतिहास आपल्या स्मृतिपटलासमोर उभा राहतो. या साहित्यकृतीने मराठी साहित्याची आणि संस्कृतीची उंची वाढवलेली आहे. हे सर्व साहित्य कालातीत आणि अजरामर ठरणारे आहे.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त संपूर्ण मराठी साहित्याची वाङ्मय प्रकारानुसार आणि अभ्यासाच्या सोयीसाठी नऊ उप-विभागात विभागणी केलेली आहे. या उप-विभागामुळेच ह्या साहित्याचा अभ्यास करणे सोईचे आणि सोपे बनलेले आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कवितासंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, नाटके, आत्मचरित्रे, चरित्रे, व्यक्तिचित्रे, लघुनिबंधसंग्रह आणि समीक्षात्मक ग्रंथ या नऊ प्रकारात त्यांचे विभाजन केलेले आहे. या नऊ उप-विभागात त्या कलाकृतींचा संक्षिप्त परिचय, वेगळेपण, आशयसूत्र, आविष्कारशैली, त्या ग्रंथांची वैशिष्ट्ये आणि योगदान इत्यादी बाबींचा उहापोह या दुसऱ्या प्रकरणात केलेला आहे. या दुसऱ्या प्रकरणाचा मागोवा (आढावा) खालीलप्रमाणे आपणास सांगता येईल.

दुसऱ्या प्रकरणातील 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कविता' या पहिल्या विभागामध्ये 'दशपदी'- कवी अनिल, 'नक्षत्रांचे देणे'- आरती प्रभू, 'सलाम'-मंगेश पाडगावकर, 'गर्भरेशीम'- इंदिरा संत, 'खूणगाठी'- ना.घ.देशपांडे, 'एकूण कविता-१'- दिलीप चित्रे, 'पानझड'-ना.धों.महानोर, आणि 'भिजकी वही'- अरुण कोलटकर या साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या आठ कवितासंग्रहांचा अभ्यास केलेला आहे.

'दशपदी' हा कवी अनिलांच्या ३९ कवितांचा कवितासंग्रह आहे. 'दशपदी' हा कविता प्रकार या कवितासंग्रहाच्या वेगळेपणाने आणि ठसठशीतपणे मराठी कवितेत प्रथम आलेला आहे. 'दशपदी'तील सर्वच कविता ह्या भावकविता आहेत. 'नक्षत्रांचे देणे' हा आरती प्रभूंचा तिसरा व शेवटचा कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहातील सर्वच कविता अधिक परिपक्व, प्रगल्भवृत्तीने लिहिलेल्या आहेत. यामध्ये प्रेम आणि निसर्गविषयक कवितांचा आविष्कार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. तरल काव्यात्मक सौंदर्य हे या कवितासंग्रहाचे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

'सलाम' ह्या मंगेश पाडगावकरांच्या कवितासंग्रहामध्ये सामाजिक व राजकीय जाणीवेच्या ४१ कवितांचा समावेश केलेला आहे. सन १९७५ साली पुकारलेल्या आणीबाणीच्या घटनेची अस्वस्थता या

कवितासंग्रहामध्ये चित्रित झालेली आहे. त्यांनी 'सलाम'मध्ये राजकीय आशयाची व उपरोधाच्या आश्रयाने समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता लिहिलेली आहे. 'गर्भरेशीम' या इंदिरा संतांच्या कविता-संग्रहामध्ये मनाचा मुलभूत असा एकटेपणा, उत्कट स्वतंत्र निसर्गदृष्टी व अत्यंत सच्चेपणाने आणि मन-स्वीपणाने स्वीकारलेले स्त्रीत्व या अंतःसूत्रांचे चित्रण केलेले आहे. निसर्ग, स्त्रीत्व आणि एकटेपण या इंदिराबाईंच्या वाचकाला परिचित असणाऱ्या धाग्यांनी 'गर्भरेशीम'चा पोत विणलेला आहे. ना.घ.देशपांडेंच्या 'खुणगाठी'या कवितासंग्रहाची नवकाव्याचा प्रभाव आणि छंदमुक्त अभिव्यक्ती ही दोन नजरेत भरणारी ठळक वैशिष्ट्ये आहेत.

'एकूण कविता-१' ह्या दिलीप चित्रेंच्या अतिशय गाजलेल्या कवितासंग्रहामध्ये त्यांच्या काव्य-लेखनाच्या एकूण चाळीस वर्षांच्या कालखंडातल्या प्रकाशित, अप्रकाशित, संकलित आणि असंकलित अशा सर्व कवितांचा समावेश केलेला आहे. भारतीय काव्यविश्वातील वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वतःचा चेहरा असलेली कविता असणारा हा अतिशय आगळावेगळा असा कवितासंग्रह आहे. ना.धों.महानोरांच्या 'पानझड'मध्ये त्यांची गाजलेली चित्रपटगीते, गीतांच्या वळणाच्या कविता आणि संत परंपरेशी जोडणारे आणि मनाला घायाळ करणारे पालखीचे अभंग आहेत. 'भिजकी वही'मध्ये अरूण कोलटकरांनी अशांतता, स्त्रियांची अवहेलना, सांस्कृतिक अधःपतन यातले नाट्य आणि कारुण्य यांचे दर्शन घडविलेले आहे. अशाप्रकारे या पहिल्या उपविभागामध्ये पुरस्कार विजेत्या आठही कवितांचे आशयसूत्र, त्यांचे स्वरूप व वैशिष्ट्ये, योगदान इत्यादी घटकांचा अभ्यास केलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणाच्या दुसऱ्या उपविभागामध्ये साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचा अर्थात 'ययाति', 'रथचक्र', 'स्वामी', 'स्मरणगाथा', 'सत्तांतर', 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'ताम्रपट', 'तणकट', 'डांगोराःएका नगरीचा', 'बारोमास', 'भूमी' आणि 'उत्सुकतेने मी झोपलो' या चौदा कादंबऱ्यांचा अल्पपरिचय करून दिलेला आहे.

तिसऱ्या उपविभगामध्ये गुरुनाथ आबाजी कुलकर्णींच्या 'काजळमाया' या कथासंग्रहातील चौदा कथांची थोडक्यात वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. तर चौथ्या उप-विभागामध्ये 'नटसम्राट' आणि 'युगान्त' या दोन्ही नाटकांचा अल्पपरिचय सांगितलेला आहे. ही दोन्ही नाटके प्रायोगिक व वाङ्मयीनदृष्ट्या अतिउच्च दर्जाची असल्यामुळे ती खूपच लोकप्रिय व बहुचर्चित ठरलेली आहेत. 'नटसम्राट' आणि 'युगान्त' या दोन्ही नाटकांनी मराठी नाट्यसृष्टीत कशा पद्धतीने मोलाची भर घातलेली आहे ते सोदाहरण सांगितलेले आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी आत्मचरित्रे' या पाचव्या उप-विभागामध्ये 'बहुरूपी'-चिंतामणराव कोल्टकर, 'जेव्हा माणूस जागा होतो'- गोदावतरीताई परुळेकर, 'उपरा'- लक्ष्मण माने, 'एक झाड आणि दोन पक्षी'-विश्राम बेडेकर, 'उचल्या'- लक्ष्मण गायकवाड, 'हरवलेले दिवस'- प्रभाकर उर्ध्वरेषे

आणि 'एका मुंगीचे महाभारत'- गंगाधर गाडगीळ इत्यादी सात आत्मचरित्रातील प्रांजळ आत्मनिवेदन, अंतर्मुखता, सत्यकथन, कलात्मक मांडणी आणि समाजप्रवण चिंतनशीलता आदी वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहजिकच त्यामुळे स्वातंतत्र्योत्तर कालखंडातील मराठी आत्मचरित्रांच्या विकासातील टप्पे अधोरेखित होण्यास निश्चितच मदत झालेली आहे. या सातही आत्मचरित्रांचा धावता आढावा या ठिकाणी घेतलेला आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी चरित्रे' या सहाव्या उपविभागामध्ये,'डॉ.केतकर'-द.ना. गोखले, 'नाट्याचार्य देवल'-श्री.ना.बनहट्टी, 'आदर्श भारतसेवक'- न.र.फाटक आणि 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य'-गो.मा.पवार ही चार चरित्रे विविधप्रकारची साधनसामुग्री गोळा करून शक्य तितके साधार व प्रमाणभूत करून लिहिलेली आहेत. चरित्रविषयक साधनांमध्ये योग्य ती निवड व योजना करून चरित्र लेखकाने या चरित्रांची कशा पद्धतीने सुबक व आकर्षकपणे मांडणी केलेली आहे ते आधार व उदाहरणांसह शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या चरित्रांनी मराठी चरित्रवाङ्मयाचा प्रांत समृद्ध व संपन्न केलेला आहे.

'साहित्य अकादमीपुरस्कारप्राप्त मराठी व्यक्तिचित्रसंग्रह' या सातव्या उपविभगामध्ये पु.ल. देशपांडे यांच्या 'व्यक्ति आणि वल्ली' या गाजलेल्या व्यक्तिचित्रसंग्रहांतील २० व्यक्तिरेखांबद्दल आणि त्यांच्या अस्सल, इरसाल स्वभाववैशिष्ट्यांसह परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पु.ल.देशपांडेंनी अतिशय नर्मविनोदी पद्धतीने आणि खुमासदार शैलीमध्ये या व्यक्तिरेखांची मांडणी कशी केलेली आहे ते समर्पक उदाहरणांसह मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी लघुनिबंध-संग्रह' या आठव्या उपविभागामध्ये दुर्गाबाई भागवतांच्या 'पैस' या लघुनिबंधसंग्रहाबद्दल थोडक्यात माहिती सांगितलेली आहे. प्रांजळ आत्मनिवेदन, मुक्त आविष्कार आणि चित्रदर्शित्व ही दुर्गाबाई भागवतांच्या 'पैस' मधील लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

दुसऱ्या प्रकरणातील 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी समीक्षात्मक ग्रंथ' या उपविभागामध्ये वैदिक संस्कृतीचा इतिहास, श्री.शिवछत्रपती, भाषा :इतिहास आणि भूगोल, सौंदर्य आणि साहित्य, भारतीय साहित्यशास्त्र, अनामिकाची चिंतनिका, युगांत, सौंदर्यमीमांसा, सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य, सौंदर्यानुभव, श्री विठ्ठल : एक महासमन्वय, टीकास्वयंवर, मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ, ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी, तुकारामदर्शन, आणि रुजुवात या १६ समीक्षात्मक ग्रंथांची वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. हे सर्वच समीक्षात्मक ग्रंथ हे मराठी समीक्षेला प्रेरणा व दिशा देणारे असून त्यांनी मराठी समीक्षेचा प्रांत समृद्ध केलेला आहे. या प्रकरणाच्या शेवटी निष्कर्षामध्ये साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या साहित्याबद्दलचे काही निष्कर्ष ठळकपणे नोंदवून समारोप केलेला आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची आशयसूत्रे आणि वैशिष्ट्ये' या प्रकरणात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त चौदा कादंबऱ्यांमधील आशयसूत्रांचा संपूर्ण आलेख तपशीलाने मांडलेला आहे. आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने या कादंबऱ्यांचा विचार केल्यानंतर या कादंबऱ्यांनी त्या-त्या उपप्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. ययाति, रथचक्र, स्वामी, स्मरणगाथा, सत्तांतर, झोंबी, झाडाझडती, राघववेळ, ताम्रपट, तणकट, डांगोरा : एका नगरीचा, बारोमास, भूमी आणि उत्सुकतेने मी झोपलो या कादंबऱ्यांतील आशयसूत्रांमध्ये खूपच नाविन्यता आणि वैविध्यपूर्णता आहे. पुरस्कारप्राप्त या कादंबऱ्यांनी यशाचे अनेकविध उच्चांक गाठलेले आहेत.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त या कादंबऱ्यांमधील आशयसूत्रांचा समग्रपणे ऊहापोह केल्यास या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासात आपला स्वतःचा वेगळा ठसा उमटविल्याचे आढळते. या कादंबरीतील आशयसूत्रे ही अतिशय महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या कादंबऱ्या ह्या मराठी कादंबरीच्या प्रांतातील मैलाचा दगड ठरलेल्या आहेत. चिंतनशीलता आणि अंतर्मुखता हे या कादंबऱ्यांचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रस्तुत प्रकरणात साररूपाने पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची आशयसूत्रे आणि वैशिष्ट्यांचा ढोबळमानाने धावता आढावा घेतलेला आहे.

वि.स.खांडेकरांच्या 'ययाति'ला सन १९६० सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे. वि.स.खांडेकरांनी माणसाच्या भोगवादातून उद्‌भवणाऱ्या विनाशाचे उत्कट दर्शन 'ययाति'मध्ये घडविलेले आहे. त्यांच्या चिंतनशील प्रवृत्तीचा आणि काव्यात्म प्रतिभेचा 'ययाति' हा कलात्मक आविष्कार आहे. ययाति, देवयानी आणि शर्मिष्ठा या तीन पात्रांच्या आत्मनिवेदनातून 'ययाति'चे कथानक उभे राहिलेले आहे. लेखकाने 'ययाति'मध्ये जीवनविषयक कुटांनी मूढ झालेला आणि अधःपतनाच्या वाटेला लागलेला ययाति आत्मविकासाच्या मार्गाला कसा येतो याची रोचक कहाणी 'ययाति'मध्ये सांगितलेली आहे. पौराणिक कथेच्या आधाराने एक सर्वोत्तम ललित कलाकृती कशी निर्माण करता येते, याचा आदर्श वस्तुपाठच 'ययाति'च्या रूपाने लेखकाने घालून दिलेला आहे. वि.स.खांडेकरांच्या 'ययाति'ने कादंबरी लेखनाकडे गांभीर्याने बघण्याची दृष्टी बहाल केलेली आहे. वि.स.खांडेकरांची 'ययाति' ही पौराणिक कादंबरी आधुनिक माणसाच्या नव्या आकांक्षांची कथा आहे. या प्रकरणात 'ययाति'च्या आशयसूत्राचा आणि वैशिष्ट्यांचा सखोल परामर्श घेतलेला आहे.

श्री.ना.पेंडसेंच्या 'रथचक्र'मुळे मराठी प्रादेशिक कादंबरीस एक नवे परिमाण लाभलेले आहे. एका आईने आपल्या मुलाचे भले होण्याकरिता केलेली धडपड आणि त्यात तिचा झालेला जय-पराजय हे 'रथचक्र'चे सर्वसामान्यपणे आदिम तत्त्वाकडे जाणारे कथासूत्र आहे. संन्याशी वृत्तीच्या नवऱ्यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये होणाऱ्या अवहेलनेचे दुःख आयुष्यभर पदरी घेऊन जगणाऱ्या कोकणातील एका ब्राह्मण

कुटुंबातील दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलेल्या अबलेची ही करुण कहाणी आहे. पेंडशांनी नियतीचा व माणसांचा संघर्ष एका सामान्य स्त्रीच्या संघर्षाच्या माध्यमातून सांगितलेला आहे. श्री.ना.पेंडसेंच्या 'रथचक्र' या कादंबरीने मराठी प्रादेशिक कादंबरीच्या क्षेत्रात मोलाची भर घातलेली आहे. श्री.ना.पेंडसेंच्या या नायिकाप्रधान कादंबरीच्या आशयसूत्रांचा आणि वैशिष्ट्यांचा धावता आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

रणजित देसाईंची 'स्वामी' ही मराठीतील अतिशय लोकप्रिय आणि रसिकमान्यता लाभलेली चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी आहे. माधवराव पेशवे यांच्या कर्तृत्वाचे आणि कर्तबगारीचे चित्र 'स्वामी'मध्ये प्रभावीपणे रेखाटलेले आहे. पानिपताच्या पराभवानंतर खचलेल्या मराठी दौलतीला सावरण्याची मोठी जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतलेल्या माधवराव पेशव्यांची आणि त्यांच्या मृत्यूनंतर सती गेलेल्या पत्नी रमाबाई यांची चरित्रगाथा 'स्वामी'मध्ये वर्णिलेली आहे. रणजित देसाईंच्या 'स्वामी' कादंबरीस पुरस्कार देऊन साहित्य अकादमीने ऐतिहासिक कादंबरीच्या काहीशा उपेक्षित दालनाकडे लक्ष वेधल्यामुळे 'स्वामी'च्या निर्मितीनंतर अनेक दर्जेदार ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे या महत्त्वाच्या ऐतिहासिक कादंबरीचे दालन समृद्ध व संपन्न होण्यास 'स्वामी'मुळे मदतच झालेली आहे. 'स्वामी'मध्ये माधवराव पेशव्यांचे चित्र रेखाटताना लेखकाने इतिहासाशी पूर्णतः इमान राखलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात रणजित देसाईंच्या 'स्वामी'मधील आशयसुत्रांचा आणि ठाळक वैशिष्ट्यांचा मागोवा घेतलेला आहे.

गो.नी.दांडेकरांच्या 'स्मरणगाथे'ने मराठी साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविलेले आहे. गोपाळ नीलकंठ दांडेकरांच्या वयाच्या तिशीपर्यंतचे आयुष्य अतिशय गतिमान स्वरूपात 'स्मरणगाथे'मध्ये शब्दांकित केलेले आहे. वयाच्या तेराव्या वर्षी घरातून पळून गेल्यानंतरच्या काळातील दांडेकरांनी घेतलेले जीवनानुभव अतिशय जगावेगळे आहेत. घरातून पळून गेल्यानंतरच्या या ३० वर्षांपर्यंतचा काळ म्हणजे दुःख आणि वेदनेचा प्रवास आहे. दांडेकरांचे पूर्वायुष्य 'स्मरणगाथे'मध्ये शब्दबद्ध झालेले आहे. या पूर्वायुष्यात त्यांनी जीवनाशी दिलेला लढा, त्यातून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, माणसांच्या अनेक तऱ्हा, निसर्गाची विशाल पार्श्वभूमी आणि जीवनव्यवहाराकडे पाहणारी निकोप दृष्टी या सगळ्यांमधून 'स्मरणगाथा' साकार झालेली आहे. निरलसपणे कष्ट करणारा, जीवनावर प्रेम करणारा आणि एक हरहुन्नरी युवक गो.नी.दांडेकरांच्या रूपाने 'स्मरणगाथे'मध्ये चितारलेला आहे. दांडेकरांच्या या आत्मचरित्रात्मक कादंबरीमधील आशयसूत्रांचे आणि वैशिष्ट्यांचे सिंहावलोकन प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे.

'सत्तांतर'मध्ये व्यंकटेश माडगूळकरांनी वानर या मानवाच्या प्राचीन सगेसोयऱ्यांची आदिम सत्ताकांक्षा आणि त्यातून उफाळलेला रक्तरंजित संघर्ष प्रतीकात्मक स्वरूपात मांडलेला आहे. 'सत्तांतर' ही

मराठीतील एक वगेळ्या धर्तीची कादंबरी आहे. मुडा, लालबुड्या आणि मोगा या वानर नायकांच्या तिन्ही टोळ्यांचे परस्परसंबंध व त्यातून घडून येणारे 'सत्तांतर' हे या कादंबरीचे बाह्य केंद्र आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी वानरांच्या जीवन वर्तमानातून मानवी सत्तासंघर्षावर आणि समकालीन राजकीय स्थितीवर मूकपणे टीकाटिप्पणी केलेली आहे. 'सत्तांतर' ही प्रतीकात्मक कादंबरी आहे. ती मधील आशयसूत्रे आणि वैशिष्ट्यांचा विस्तृत आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

'झोंबी' ही आनंद यादवांची ग्रामीण वास्तव चैतन्यमय करणारी आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. आनंद यादवांनी 'झोंबी'मध्ये त्यांच्या बालपणापासून ते मॅट्रिकपर्यंतचा जीवनप्रवास कसा शब्दबद्ध केलेला आहे. शिक्षणाची कोणतीही परंपरा नसलेल्या एका शेतकऱ्याच्या कुटुंबातील मुलाने अगदी प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षणासाठी घेतलेल्या झोंबीचे चित्रण 'झोंबी'मध्ये शब्दांकित केलेले आहे. 'झोंबी' म्हणजे 'बाल्य हरवलेले बालकांड' असल्याचा उल्लेख पु.ल.देशपांडे यांनी 'झोंबी'च्या प्रस्तावनेत केलेला आहे. आनंदा शाळेत गेल्यापासून ते एस.एस.सी. होईपर्यंतच्या काळातील अनुभव, भोवतीचा परिसर, कुटुंबातील आणि गावातील इतर व्यक्ती, घरातील कष्ट, दारिद्र्यामुळे घरादाराला आणि मनाला येणारी अवकळा, ग्रामीण भागातील माणसांमध्ये आणि आनंदाच्या आईबापांमध्येही असणारे शिक्षणाचे औदासिन्य, शिकण्यासाठी आनंदाच्या मनाची होणारी तगमग या साऱ्यांचे ग्रामीण बोलीतील निवेदन यामुळे 'झोंबी'ला एकवेगळीच उंची लाभलेली आहे. आनंद यादवांच्या 'झोंबी'ने मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्मयामध्ये इतिहास निर्माण केलेला आहे. यशाची अनेक मानांकने या कादंबरीने पटकावलेली आहेत. 'झोंबी'मधील आशयसूत्रे आणि वैशिष्ट्यांचा ऊहापोह प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

'झाडाझडती'मध्ये विश्वास पाटील यांनी धारणग्रस्तांचे, नोकरशाहीचे आणि सत्तेचे राजकारण करणाऱ्यांचे जग हे अतिशय हृदयद्रावकपणे मांडलेले आहे. धरणग्रस्तांच्या आणि त्यांच्या पुनर्वसनाच्या समस्या अधोरेखित करणारी ही पहिलीच कादंबरी असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. धरणामुळे विस्थापित झालेल्या अनेक कुटुंबांची वाताहत 'झाडाझडती'मध्ये लेखकाने प्रभावीपणे मांडलेली आहे. विश्वास पाटलांनी धरणामुळे विस्थपित झालेल्या समुहाचे चित्रण अतिशय वास्तवपणे शब्दबद्ध केलेले आहे. अनुभवाच्या विराटपणामुळे या कादंबरीला लाक्षणिक अर्थाने गद्य महाकाव्याचे रूप प्राप्त झालेले आहे. लेखकाने 'झाडाझडती'चे सात विभाग करून त्यातून जांभळी गावाचे धरणामुळे उठणे, आणि पुनर्वसन होता होता तुकड्या तुकड्यांनी तुटत जाणे अतिशय वास्तव पद्धतीने चितारलेले आहे. धरणांमुळे ज्यांच्या आयुष्याची राखरांगोळी झालेली आहे, त्यांच्या मानसविश्वाचा धांडोळा 'झाडाझडती'मध्ये घेतलेला आहे.

नामदेव कांबळेंनी 'राघववेळ'मध्ये रघू या नायकाच्या जीवनचरित्रासह मातंग जातीचा गावगाड्या-

तील इतिहासच शब्दांकित केलेला आहे. 'राघववेळ'मधून अलक्षित, अस्पर्शित आणि मातंग समाजाची कथा-व्यथा साकार केलेली आहे. 'राघववेळ' ही विधवा वालंबी ह्या मातंग जातीतील स्त्रीची जीवनकहाणी आहे. तसेच मातंग समाजामध्ये हळूहळू नव्या जाणिवांचा उदय कसा होत आहे, हे ही लेखकाने अतिशय प्रभावीपणे सांगितलेले आहे. सामाजिक संक्रमणावस्थेतील वास्तवाचे फार सूक्ष्म अवलोकन 'राघववेळ' मध्ये केलेले आहे. कलात्मक सौंदर्य हे 'राघववेळ'मध्ये फार मोठे बलस्थान आहे. नामदेव कांबळेंनी स्वातंत्र्याच्या पहाटेचे चित्र आणि सामाजिक वास्तवही तितक्याच ताकदीने 'राघववेळ'मध्ये मांडलेले आहे. 'राघववेळ'मधील आशयविश्व हे अतिशय नाविन्यपूर्ण आणि परिणामकारी आहे. 'राघववेळ'ने दलित कादंबरी विश्वामध्ये आपल्या अस्तित्वाच्या स्वतंत्र नाममुद्रा उमटविलेल्या आहेत. या संदर्भात सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे.

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारेंची महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा विस्तृत पट भक्कम विस्ताराने आणि समर्थपणे उलघडून दाखविणारी राजकीय कादंबरी आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय जीवनाचे तपशीलवार चित्रण करणारी ही पहिली राजकीय कादंबरी आहे. 'ताम्रपट'मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणाच्या रोमहर्षक दर्शनाबरोबरच स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचाही आलेख कसा चितारलेला आहे, हे सांगण्याचा प्रयत्न या घटकांमध्ये केलेला आहे. 'ताम्रपट'मध्ये इ.स.१९४२ ते इ.स.१९७९ पर्यंतच्या जवळपास ४० वर्षांच्या कालखंडातील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक अशा बहु अंगांनी विस्तृत वेध कसा घेतलेला आहे ते साक्षेपाने या घटकामध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राजन गवस यांनी 'तणकट'मध्ये ग्रामीण भागातील दलित-सवर्णांच्या जीवनवास्तवाचा वेध घेतलेला आहे. 'तणकट' ही साधारणपणे आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी कालखंडातील समकालीन वास्तव मांडणारी कादंबरी आहे. बदलत्या ग्रामव्यवस्थेचे सूक्ष्म तपशीलांसह परिणामकारी सादरीकरण 'तणकट' मध्ये झालेले आहे. राजन गवस यांनी 'तणकट'मध्ये दलित चळवळींचे अपयशही अधोरेखित केलेले आहे. समकालीन ग्रामीण भागातील गावगाडा, म्हारवाडा आणि मांगवाड्यावर विधायक व मार्मिक भाष्य करणारी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सांस्कृतिक विघटनाचा आणि मूल्यऱ्हासाचा विस्तारपूर्वक आलेख राजन गवस यांनी 'तणकट'मध्ये शब्दांकित केलेला आहे.

'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये त्र्यं.वि.सरदेशमुखांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्थानी राजकारणाचे आणि समाजस्थितीचे चित्रण केलेले आहे. इ.स.१९२२ ते इ.स.१९२९ या कालावधीत 'साइखेड' या संस्थानाने भोगलेल्या अनुभवांची कहाणी 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये रेखाटलेली आहे. संस्थानी वातावरण, इंग्रजांचा हस्तक्षेप, त्यांची कुटील संधीसाधू धोरणे, एतद्देशियांचे अडाणीपण इत्यादी अनेक

बाबींचे 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये आलेले चित्रण हा तत्कालीन काळाचा वाङ्मयीन दस्तऐवजच आहे. 'साइखेड' या काल्पनिक संस्थानातील घडामोडींचे सखोल तपशीलवार, विराट आणि भयावह चित्र 'डांगोरा: एका नगरीचा'मध्ये चित्रित झालेले आहे. साइखेडमध्ये मनस्वी राजाच्या आत्महत्येनंतर राणी दमयंतीला नजरबंद करून काही मुजोर, सत्तांध व पिसाट अधिकारी वर्गाने या संस्थानावर फिरविलेल्या वरवंट्याचे व त्यात भरडल्या गेलेल्या सात्त्विक प्रजाजनांचे मूक रुदन 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये अतिशय सुरेखपणे मांडलेले आहे. त्याचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

सदानंद देशमुखांनी 'बारोमास'मध्ये शेतकऱ्यांच्या बारमाही व्यथा वेदनेचा वेध घेतलेला आहे. सदानंद देशमुखांनी शेतकऱ्यांच्या जीवनाचे आजचे समकालीन वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या शोधाची करुण कहाणी 'बारोमास'मध्ये मांडलेली आहे. भारतीय कृषक जीवनाचे हे शोकनाट्य लेखकाने सर्जनशील दृष्टीने साकार केलेले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कृषक समाजाचे वास्तव अधोरेखित करणारी एक महत्त्वाची कादंबरी म्हणून 'बारोमास'चा उल्लेख करावा लागेल. 'बारोमास' ही आजच्या शेतीयुगाशी निगडित शेतकऱ्यांची, त्यांच्या सुशिक्षित पण बेरोजगार असलेल्या मुलांची आणि खुद्द शेतीचीही करुण शोकगाथा आहे. लहरी निसर्ग, बाजारपेठा आणि सरकारची चुकीची धोरणे यामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्याची जी धूळदाण झालेली आहे, त्याचे अतिशय हुबेहूब चित्रण 'बारोमास'मध्ये कसे चित्रित केलेले आहे, त्याबद्दल सविस्तर माहिती या प्रकरणात मांडलेली आहे.

आशा बगेंच्या 'भूमी'मध्ये मैथिली या एका पोरक्या पण मनस्वी आणि जीवनाच्या प्रवासात स्वयंसिद्धा ठरलेल्या मुलीची कहाणी शब्दबद्ध केलेली आहे. मैथिलीच्या बालपणापासून ते प्रौढपणापर्यंतचा जीवनप्रवास लेखिकेने मांडलेला आहे. परंपरेचा धागा न सोडता सनातन नात्यातील नवेपण शोधणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. आजच्या आधुनिक काळातील नोकरी करून घर सांभाळणाऱ्या अनेक स्त्रियांची व्यथा मैथिलीच्या रूपाने लेखिका आशा बगेंनी 'भूमी'मध्ये रेखाटलेली आहे. मैथिलीने बालपणापासून ते प्राध्यापिका होण्यापर्यंतचा खडतर प्रवास कसा केलेला आहे, त्याचा सोदाहरण तपशील या घटकामध्ये केलेला आहे. आशा बगेंच्या 'भूमी'ने मराठी स्त्रीवादी साहित्यामध्ये एक नवा आदर्श निर्माण केलेला आहे. 'भूमी'मधील मैथिली पारंपरिक मूल्यांची जोपासना करीत असतानाच आधुनिक मानवी जीवनमूल्यांचा कसा स्वीकार करते, हे आशा बगेंनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने सांगितलेले आहे.

'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीमध्ये श्याम मनोहरांनी आशय आणि अभिव्यक्तीचा एक नवीनच प्रयोग केलेला आहे. लेखकाने मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचा सहृदय, भेदक आणि प्रांजळपणाने वेध या कादंबरीत घेतलेला आहे. 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे', 'कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू' आणि 'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' अशा तिन्ही विभागांच्या माध्यमातून कुटुंब निर्माण होणे, कुटुंब फुटणे आणि

कुटुंबव्यवस्थेतील एकाकीपण यांचा उभा-आडवा छेद या कादंबरीत घेतलेला आहे. श्याम मनोहरांनी 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीमध्ये निर्मिती, विघटन आणि एकाकीपण या अवस्थांतल्या मध्यमवर्गीय भिन्न-भिन्न वयोगटातील कुटुंबव्यवस्थेचे दर्शन घडविलेले आहे. या तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटी निष्कर्षामध्ये साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यातील आशसूत्रांचा आणि वैशिष्ट्यांचा समग्र आणि चिकित्सकपणे ऊहापोह करून या चोदा कादंबऱ्यांच्या अभ्यासा अंती हाती आलेले काही ठळक निष्कर्ष नोंदवून समारोप केलेला आहे.

'साहित्य अकादमीच्या निकषांच्या आधारे कादंबऱ्यांचे अवलोकन' या चौथ्या प्रकरणामध्ये या कादंबऱ्यांचे वाङ्मयीनदृष्ट्या विवेचन आणि विश्लेषण केलेले आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या या वाङ्मयीन गुणात्मकदृष्ट्या अत्यंत सर्वोत्कृष्ट आहेत. या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरी वाङ्मयाला प्रेरणा आणि दिशा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये ययाति, रथचक्र, स्वामी, स्मरणगाथा, सत्तांतर, झोंबी, झाडाझडती, राघववेळ, ताम्रपट, तणकट, डांगोरा : एका नगरीचा, बारोमास, भूमी आणि उत्सुकतेने मी झोपलो या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांतील प्रमुख व दुय्यम व्यक्तिरेखा, प्रसंगचित्रणे, वातावरणनिर्मिती, संवादशैली, निवेदनशैली, भाषाशैली, वैशिष्ट्ये आदी घटकांच्या अनुषंगाने वाङ्मयीन मूल्यमापन केलेले आहे. या घटकांचा सखोल, सविस्तर आणि समग्रपणे वेध घेऊन या कादंबऱ्यांचा चौफेर आणि बहुअंगाने ऊहापोह या प्रकरणात केलेला आहे.

'ययाति'ला वि.स.खांडेकरांच्या जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व लाभलेले आहे. पौराणिकता आणि त्यातून सांगितलेला सनातन सामाजिक आशय हे 'ययाति'चे मुख्य वैशिष्ट्य आहे. खांडेकरांची 'ययाति'ची कथा महाभारतातल्या कथेपेक्षा लौकिकातील प्रचलित पुराणकथेच्या अनुषंगाने जाणारी आहे. पौराणिक कथाभागात लेखकाने आपल्या सोयीनुसार त्यात भर घातलेली आहे. जीवनात तृप्ती, शांती कशी येईल हे भावात्मक सत्य खांडेकरांनी 'ययाति'मध्ये सांगितले आहे. काही कथानक सांगणे, वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा निर्माण करणे यापेक्षा जीवनचिंतनाला खांडेकरांनी अधिक प्राधान्य दिलेले आहे. ययाति, देवयानी, शर्मिष्ठा आणि कच ही 'ययाति'मधील अत्यंत महत्त्वाची पात्रे आहेत. ययाति-देवयानी आणि कच-देवयानी यांच्या भावसंघर्षातून ययाति-शर्मिष्ठा यांच्या प्रणयाला एक वेगळाच गहिरेपणा खांडेकरांनी दिलेला आहे. ययाति, शर्मिष्ठा, देवयानी, व कच या युगुलांच्या भावसंबंधांचे आरस्पानी दर्शन 'ययाति'मध्ये रेखाटलेले आहे.

'ययाति'पासून पौराणिक कादंबऱ्यांची परंपरा झपाट्याने महाराष्ट्रामध्ये रूजलेली आहे. महाकाव्याच्या जातीचा भावानुभव खांडेकरांनी 'ययाति'मध्ये गोचर केलेला आहे. वि.स.खांडेकरांनी 'ययाति' च्या रुपाने मराठी साहित्य संस्कृतीचा एक आदर्शच प्रस्थापित केलेला आहे. बुद्धिनिष्ठा, भावनिष्ठा आणि

तत्त्वनिष्ठा यांचा तिहेरी संगम 'ययाति'मध्ये झालेला आहे. 'ययाति'चे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिला लाभलेली अलौकिक भाषाशैली होय. 'ययाति'मधील सुभाषितवजा वाक्ये हा तर खांडेकरांचा हुकमी एक्काच आहे. 'ययाति'मधील खांडेकरांची शैली अलंकारिक आहे. कल्पनारम्यता, अलंकारप्रचूरता, काव्यमयशैली, सुभाषितांची पखरण आणि चिंतनशीलता इत्यादी गुणवैशिष्ट्यांनी नटलेल्या 'ययाति'ने भारतीय साहित्यविश्वावर स्वतःची नाममुद्रा उमटविलेली आहे. या सर्व घटकांच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात मागोवा घेतलेला आहे.

श्री.ना.पेंडसेंच्या 'रथचक्र'ने मराठीतील प्रादेशिक कादंबरीला बळकटी आणण्याचे काम केलेले आहे. चौथ्या प्रकरणातील ' 'रथचक्र'चे वाङ्मयीन अवलोकन' या उपघटकामध्ये 'रथचक्र'चे वाङ्मयीन-दृष्ट्या मूल्यमापन केलेले आहे. 'रथचक्र'मधील जवळपास सर्वच व्यक्तिरेखा या मराठी वाङ्मयामध्ये अनेकविध कारणांमुळे गाजलेल्या आहेत. 'रथचक्र'मधील आशयाशी सुसंगत असलेल्या वातावरणनिर्मिती आणि प्रसंगचित्रणामुळे तिची वाङ्मयीन श्रेष्ठता वाढलेली आहे. संवाद हे पेंडशांच्या 'रथचक्र'चे सामर्थ्य आहे. 'रथचक्र'मधील निवेदनशैली अपूर्व आहे. 'रथचक्र'मध्ये कोकण परिसरातील प्रादेशिक बोलीभाषेचा वापर केल्यामुळे तीमधील भाषाशैलीला ताजेपणा आणि टवटवीत जिवंतपणा लाभलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील या उपघटकामध्ये 'रथचक्र'मधील वाङ्मयीन घटकांचा समग्रपणे आढावा घेतलेला आहे.

रणजित देसाईंच्या 'स्वामी'ने ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरीच्या क्षेत्रामध्ये नवा इतिहास रचलेला आहे. 'स्वामी'मधील सर्वच व्यक्तिरेखा या अतिशय उठावदार आणि कलात्मक बनलेल्या आहेत. साधी, सोपी आणि सुटसुटीत वाक्यरचना हे 'स्वामी'च्या संवादांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. माधवराव पेशव्यांचे व्यक्तिमत्त्व फुलविण्यासाठी लेखकाने ऐतिहासिक वातावरणाचा अतिशय सुरेखपणे वापर केलेला आहे. 'स्वामी'ची निवेदनशैली ही साधी, सरळ आणि प्रमाणभाषा व बोली यांच्या संमिश्रानी युक्त असून ती वर्णनात्मक आहे. रणजित देसाईंच्या 'स्वामी'ला लाभलेल्या लोकप्रियतेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तीमधील भाषाशैली ही होय. उठावदार व्यक्तिरेखा, उत्कृष्ट प्रसंगचित्रणे, वातावरणनिर्मिती कौशल्य, चिंतनशील स्वगते, नाट्यपूर्ण संवाद, विचारप्रवर्तक वाक्ये आणि चित्ताकर्षक भाषाशैली इत्यादी घटकांनी नटलेल्या 'स्वामी'चे वाङ्मयीन अवलोकन या प्रस्तुत प्रकरणातील उपघटकांमध्ये मांडलेले आहे.

गो.नी.दांडेकरांच्या 'स्मरणगाथे'नी मराठी साहित्य जगताला एका आगळ्यावेगळ्या जीवनाचे दर्शन घडविलेले आहे. 'स्मरणगाथे'तील पात्रसृष्टी ही अतिशय वैविध्यपूर्ण आहे. 'स्मरणगाथे'तील निसर्गवर्णने ही अतिशय चित्ताकर्षक व नयनमनोहर आहेत. निवेदनाचा विस्मयकारक वेग हा 'स्मरणगाथे'चा एक महत्त्वाचा गुण आहे. संवादातील रचना हे देखील गो.नी.दांडेकरांच्या 'स्मरणगाथे'चे लक्षणीय वैशिष्ट्य आहे. प्रदेशानुसार आणि व्यक्तिपरत्वे बदलणारी भाषा हे 'स्मरणगाथे'चे एक अविभाज्य अंग आहे.

'स्मरणगाथे'तील पात्रे, निसर्गवर्णने, वातावरणनिर्मिती, संवादशैली, निवेदनशैली आणि भाषाशैली इत्यादी अनेकविध बाजूंनी चिकित्सकपणे मांडणी या उपघटकांमध्ये केलेली आहे.

व्यंकटेश माडगुळकरांची 'सत्तांतर' ही मराठी साहित्यातील वेगळ्या धाटणीची राजकीय कादंबरी आहे. मुडा, मोगा आणि लालबुड्या यांच्या तिन्ही वानर टोळीतील सत्तासंघर्ष हे 'सत्तांतर'चे मध्यवर्ती कथानक आहे. 'सत्तांतर'मधील मुडा, मोगा आणि लालबुड्या तसेच इतर नर-मादी वानरे ही प्रतीकात्मक आहेत. लेखकाने त्यांची अतिशय सुंदर शब्दांमध्ये शब्दचित्रे रेखाटलेली आहेत. लेखकाने 'सत्तांतर'मधील वातावरणनिर्मिती आशयसूत्राला अनुसरणारी योजिलेली आहे. वानर प्राण्याच्या जगाचे अत्यंत समर्थ, रोचक, सुंदर आणि विश्वसनीय चित्रण मराठीमध्ये सर्वप्रथम 'सत्तांतर'च्या रूपाने आलेले आहे. 'सत्तांतर'च्या यशस्वितेमध्ये ती मधील वातावरणनिर्मितीचा मौलिक हातभार लाभलेला आहे. 'सत्तांतर'मधून वानर आणि त्यांच्या भोवतीचा परिसर, जंगल आणि इतर पशू-पक्षी यांच्या संबंधाचा पट लेखकाने कलात्मकपद्धतीने मांडलेला आहे. 'सत्तांतर'मधील निवेदनशैली ही लहान-लहान वाक्यांनी, साध्या-सोप्या शब्दांनी आणि वाक्प्रचारानी नटलेली आहे. 'सत्तांतर'मधील भाषाशैली ही अनुभवदर्शनात्मक आहे. या अनेकविध घटकांचा परामर्श प्रस्तुत प्रकरणामध्ये घेतलेला आहे.

आनंद यादवांची 'झोंबी' ही ग्रामीण जीवनाचे चैतन्याहारी दर्शन घडविणारी आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. आनंदा रतनू जकाते हा 'झोंबी'चा नायक आहे. आनंदा, रतनू आणि तारा या तिघा माय-बाप-लेकाची करुण कहाणी लेखकाने कमालीच्या ताकदीने 'झोंबी'मध्ये शब्दांकित केलेली आहे. 'झोंबी'मधील पात्रसृष्टी ही अतिशय वास्तववादी आहे. 'झोंबी'मध्ये जकाते कुटुंब आणि त्या कुटुंबाशी संबंधित असलेल्या साठ-पासष्ठ व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. 'झोंबी'चे निवेदन हे जरी प्रमाणभाषेतील असले तरी तीमधील संवाद हे मात्र कागल आणि कोल्हापूर परिसरातील बोलीभाषेमधीलच आहेत. 'झोंबी'ची निवेदनशैली ही कालक्रमनिष्ठ आणि प्रथमपुरुषी व सर्वसाक्षी तृतीयपुरुषी अशा स्वरूपाची आहे. आनंद यादवांच्या 'झोंबी'ने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीने मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासामध्ये आपले वेगळेपण सिद्ध केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणामधील या उपघटकामध्ये सखोल व सविस्तरपणाने 'झोंबी'चे वाङ्मयीनदृष्ट्या अवलोकन केलेले आहे.

विश्वास पाटलांच्या 'झाडाझडती'मध्ये धरणग्रस्तांच्या जीवनाची झालेली वाताहत असंख्य पात्रांच्या साहाय्याने दाखविलेली आहे. मुळातच 'झाडाझडती' ही व्यक्तिकेंद्री कादंबरी नसून ते एका धरणामुळे विस्थापित झालेल्यांचे समूहचित्रण आहे. रूढार्थाने 'झाडाझडती' या कादंबरीला नायक-नायिका नाहीत. 'झाडाझडती'मधील आशयसूत्र आणि वातावरणनिर्मिती यांच्यात एकरूपत्व आहे. 'झाडाझडती'मधील निवेदन हे प्रामुख्याने तृतीयपुरुषी आणि संवादात्मक पद्धतीचे आहे. लेखकाने 'झाडाझडती'मध्ये अनेकविध

प्रसंगांचे काव्यमय चित्र रेखाटलेले आहे. 'झाडाझडती'मधील प्रसंगवर्णने आणि स्थळवर्णने खूपच वास्तव आहेत. 'झाडाझडती'मधील वर्णनशैली व संवादशैली ही अत्यंत उल्लेखनीय आहे. 'झाडाझडती'ला लाभलेल्या लोकप्रियतेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ती मधील भाषाशैली होय. या सर्व घटकांच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात सखोल आणि सविस्तरपणे मांडणी केलेली आहे.

रंगनाथ पठारेंच्या 'ताम्रपट'मध्ये राजकारण, सहकार, शिक्षण आणि ग्रामीण परिसरातील व्यक्तींचा समग्रपणे वेध घेतलेला आहे. लेखकाने 'ताम्रपट'मध्ये फार मोठा पात्रसंच उभा केलेला आहे. 'ताम्रपट'मधील वातावरणनिर्मिती आणि संवादशैलीला अनन्यसाधारण महत्त्व लाभलेले आहे. 'ताम्रपट'च्या निवेदनातील विविधांगी व तिरकसपणामुळे तिच्या निवेदनशैलीमध्ये रंगत आलेली आहे. ती मधील भाषाशैली हा एक रंगनाथ पठारेंचा मोठा महत्वाकांक्षी प्रयोग आहे. या सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ'ने खऱ्या अर्थाने मराठी साहित्यविश्व समृद्ध केलेले आहे. मातंग समाजातील जीवनरहाटी त्यांच्या श्रद्धा, समजुती, चालीरिती, रूढी, परंपरा आदींच्या साहाय्याने मांग जमातीचे वास्तवदर्शी चित्रण 'राघववेळ'मध्ये केलेले आहे. रघू, वालंबी, कौशी, सीताराम, पायरू, हरणी तसेच गावातील इतर सवर्ण मंडळी यांचे हुबेहूब व्यक्तिचित्र त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांनिशी उभे केलेले आहे. वैदर्भीय बोलीचे एक नवे दालनच 'राघववेळ'मध्ये चित्रित झालेले आहे. वरकर्मी अत्यंत सोपे आणि सरळ निवेदन असणारी ही कादंबरी आपल्या अनेक वैशिष्ट्यांमुळे रसिकांना अस्वस्थ आणि अंतर्मुख करते.

राजन गवस यांची 'तणकट' यांची कादंबरी पात्रसृष्टीने खचाखच भरलेली आहे. राजन गवस यांच्या 'तणकट'मधील संवादशैलीने आशयाला अधिक सखोल आणि व्यापक रूप दिलेले आहे. सदानंद देशमुखांच्या 'बारोमास'मधील काही व्यक्तिरेखा या प्रभावी तर काही व्यक्तिरेखा या दुय्यम स्वरूपाच्या आहेत. लेखकाने 'बारोमास'मध्ये चित्रिलेली पात्रे हे या कादंबरीचे फार मोठे बलस्थान आहे. 'बारोमास' मधील वातावरणनिर्मिती ही जिवंत दृक्-प्रत्यय देणारी आहे. प्रसंगांच्या चित्रमण उभारणीतून त्यांनी भारतीय कृषक जीवनाचं शोकनाट्य सर्जनशील दृष्टीने 'बारोमास'मध्ये साकार केलेले आहे. त्यांच्या चित्रमय वर्णनशैलीमुळेच 'बारोमास'ची आशयसमृद्धता वाढलेली आहे. सदानंद देशमुखांच्या प्रभावी संवादशैली-मुळेच 'बारोमास'ही कादंबरी चैतन्यमय बनलेली आहे. 'बारोमास'मध्ये उपयोजिलेल्या म्हणी आणि वाक्प्रचारांच्यामुळे ती मधील भाषेला आशयघनता, सजीवता आणि सारगर्भता प्राप्त झालेली आहे. 'बारोमास'मध्ये निवेदनासाठी लेखकाने तृतीयपुरुषी निवेदनशैलीचा अवलंब केलेला आहे. सदानंद देशमुखांची 'बारोमास'मधील भाषाशैली मराठी गद्याला अनेक अंगानी समृद्ध करणारी आहे. या सर्व बाबींचा परामर्श या प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

आशा बगेंच्या 'भूमी'मध्ये लहान-मोठ्या सुमारे पंचवीस व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. ठसठशीत व जिवंत व्यक्तिरेखांमुळेच 'भूमी'चे आशयसौंदर्य वृद्धिंगत झालेले आहे. आशा बगेंची 'भूमी' ही कादंबरी म्हणजे त्यांच्या वर्णनशैलीचा उत्तम नमुना आहे. 'भूमी'मधील वातावरणनिर्मिती आणि प्रसंगचित्रणे ही मनोवेधक आहेत. 'भूमी' ही कादंबरी विपूल संवादांनी नटलेली आहे. आपल्या प्रतिभासामर्थ्याने त्यांनी 'भूमी'मधील संवादशैलीला वेगळे परिमाण प्राप्त करून दिलेले आहे. लेखिकेने 'भूमी'मधील निवेदनासाठी सर्वसाक्षी लेखिकाश्रयी निवेदनपद्धतीची निवड केलेली असल्यामुळे पात्रचित्रणात व कथारचनेत त्यांना भरपूर सवलत मिळालेली आहे. 'भूमी'च्या भाषाशैलीत नागपूरसारख्या शहरातील वैदर्भीय भाषेचा आंतरिक गोडवा झिरपलेला आहे. आशा बगेंची 'भूमी' ही कादंबरी अशा अनेक गुणवैशिष्ट्यांनी नटलेली आहे. स्थलवर्णने, प्रसंगवर्णने, व्यक्तिचित्रणे यांनी परिपूर्ण असलेल्या 'भूमी'मधील वाक्यांना सुभाषितांचेही रूप लाभलेले आहे. या अनेक वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांच्या आधारे 'भूमी'चे वाङ्मयीन अवलोकन प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे.

श्याम मनोहरांनी 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीमध्ये विशिष्ट स्वभावधर्मानी युक्त असलेल्या पात्रांची निर्मिती कुटुंबव्यवस्थेच्या चौकटीत करून कादंबरीचा आशय अधिक प्रभावीपणे व्यक्त केलेला आहे. 'उत्सुकतेने मी झोपलो'मधील प्रसंगचित्रणे आणि वातावरणनिर्मिती ही आशयाला पूरक अशा स्वरूपाची आहे. श्याम मनोहरांच्या 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीला जे यश लाभलेले आहे, त्यामध्ये त्यांच्या निवेदनशैलीचा फारच मौलिक वाटा आहे. पात्रांच्या संवादातून लेखकाने आशयाला विविध स्तर प्राप्त करून दिलेले आहेत. श्याम मनोहर हे प्रयोगशील कादंबरीकार असल्यामुळे या कादंबरीतील भाषाशैली ही मुलायम, मृदु आणि प्रासादिक आहे. प्रस्तुत प्रकरणात 'उत्सुकतेने मी झोपलो' या दर्जेदार कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन केलेले आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये पहिल्या चार प्रकरणांमध्ये केलेल्या विवेचनाचा थोडक्यात परामर्श घेतलेला आहे.

# १. आधारभूत संदर्भग्रंथ सूची


१. वि.स.खांडेकर, 'ययाती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, सत्ताविसावी आवृत्ती : ऑगस्ट, २००८ (१९५९)

२. श्री.ना.पेंडसे, 'रथचक्र', मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती दुसरी- १९६४

३. रणजित देसाई, 'स्वामी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती-ऑगस्ट १९६२

४. गो.नी.दांडेकर, 'स्मरणगाथा', मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे-०२, पहिली आवृत्ती : ८ जुलै, १९७३

५. व्यंकटेश माडगूळकर, 'सत्तांतर', मॅजेस्टिक प्रकाशन, मंबई ०४, पहिली आवृत्ती-जुलै, १९८२

६. आनंद यादव, 'झोंबी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती-डिसेंबर, १९८७

७. विश्वास पाटील, 'झाडाझडती', राजहंस प्रकाशन, पुणे-३०,आवृत्ती पहिली -१९९१

८. नामदेव चं.कांबळे, 'राघववेळ', देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., पुणे-३०, आवृत्ती पाचवी- २००८

९. रंगनाथ पठारे, 'ताम्रपट', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई-०४, पहिली आवृत्ती-९ ऑगस्ट, १९९४

१०. राजन गवस, 'तणकट', साकेत प्रकाशन औरंगाबाद-०५, पहिली आवृत्ती-१९८८

११. त्र्यं.वि.सरदेशमुख, 'डांगोरा : एका नगरीचा', मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, पहिली आवृत्ती-एप्रिल १९९८

१२. सदानंद देशमुख, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०, प्रथमावृत्ती-२००२

१३. आशा बगे, 'भूमी', मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, पहिली आवृत्ती-१० डिसेंबर, २००४

१४. श्याम मनोहर, 'उत्सुकतेने मी झोपलो', पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., मुंबई-२६, पहिली आवृत्ती-२००६

## २. साहाय्यक आधारभूत ग्रंथांची सूची

१ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वैदिक संस्कृतीचा इतिहास, प्राज्ञ पाठशाळा, वाई, प्रथमावृत्ती- १९५२

२. मर्ढेकर बा.सी. सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, पाचवी आवृत्ती, ऑगस्ट, १९९२

३. कोल्हटकर चिंतामण गणेश, बहुरूपी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-०४, प्रथमावृत्ती, १९५६

४. देशपांडे गजानन त्र्यंबक, भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६, प्रथमावृत्ती, १९५७

५. गोखले द.न., डॉ.केतकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, पहिली आवृत्ती-२० सप्टेंबर, १९५९

६. देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण, व्यक्ति आणि वल्ली, मौज प्रकाशन गृह, मुंबई २६, तिसरी आवृत्ती-१९६६

७. कालेलकर ना.गो., भाषा : इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९६४

८. कर्वे इरावती, युगांत, देशमुख आणि कंपनी, पुणे-३०, प्रथमावृत्ती-१९६७

९. बनहट्टी श्रीनिवास नारायण, नाट्याचार्य देवल, श्री.ना.बनहट्टी, पुणे-०४, प्रथमावृत्ती-१९६७

१०. फाटक न.र., आदर्श भारतसेवक (गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र), मौज प्रकाशन गृह,मुंबई-२६

११. भागवत दुर्गा, पैस, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९९९

१२. परूळेकर गोदावरी, जेव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९९९

१३. कुलकर्णी गुरुनाथ आबाजी, काजळमाया, पॉप्युलर प्रकाशन मुंबई-२६, द्वितीयावृत्ती -१९८२

१४. शिरवाडकर विष्णू वामन, नटसम्राट, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६,प्रथमावृत्ती-१९९२

१५. पाटणकर रा.भा., सौंदर्यमीमांसा, इस्थेटिक्स सोसायटी आणि मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९७४

१६. आत्माराम रावजी देशपांडे, दशपदी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, ०४, पहिला आवृत्ती-१९७६

१७. खानोलकर चिं.त्र्यं., नक्षत्रांचे देणे, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९७५

१८. मुक्तिबोध शरच्चंद्र, सृष्टी, 'सौंदर्य' आणि साहित्यमूल्य, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती- फेब्रुवारी, १९७८

१९. पाडगांवकर मंगेश, सलाम, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९७८

२०. माने लक्ष्मण, उपरा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती-१९८०

२१. पाध्ये प्रभाकर, सौंदर्यानुभव, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९७९

२२. संत इंदिरा, गर्भरेशीम, नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, प्रथमावृत्ती-२५ जानेवारी, १९८२

२३. बेडेकर विश्राम, एक झाड आणि दोन पक्षी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६, प्रथमावृत्ती-१९८४

२४. देशपांडे नागोराव घनःश्याम, खूणगाठी, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९८५

२५. ढेरे रा.चिं., श्री विठ्ठल : एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती -२००५

२६. गायकवाड लक्ष्मण, उचल्या, श्रीविद्या प्रकाशन गृह, पुणे-३०, नववी आवृत्ती-२६ जानेवारी, २००९

२७. उर्ध्वरेषे प्रभाकर, हरवलेले दिवस, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-ऑक्टोबर, १९८७

२८. नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-२००१

२९. राजाध्यक्ष विजया, मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९९१

३०. गाडगीळ गंगाधर, एका मुंगीचे महाभारत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६

३१. धोंड मधुकर वासुदेव, ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८१

३२. मोरे सदानंद श्रीधर, तुकारामदर्शन, गाज प्रकाशन, अहमदनगर- ०१

३३. महानोर नामदेव धोंडो, पानझड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४, प्रथमावृत्ती-१९९७

३४. एलकुंचवार महेश, युगान्त, मौज प्रकाशन, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९९७,

३५. कोलटकर अरूण बाळकृष्ण, भिजकी वही, प्रास प्रकाशन, मुंबई

३६. पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य, लोकवाङ्मय गृह, मुंबई-२५,पहिली आवृत्ती-मे, २००४

# ३. संदर्भग्रंथ सूची


१. जोग ल.ग., 'कादंबरी', चिरंजीव ग्रंथप्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती- १९६३

२. बापट प्र.वा., गोडबोले ना. वा., 'मराठी कादंबरी : तंत्र व विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी-१९७३

३. कुलकर्णी श्री.मा., 'कादंबरीची रचना', उन्मेष प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती-१९५६

४. देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, आवृत्ती दुसरी-१९७५

५. भोळे भा.ल., 'साहित्यप्रत्यय', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली-२००१

६. थोरात हरिश्चंद्र, 'कादंबरीविषयी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती-१९९८

७. तुपे केशव, 'साहित्य :सर्जन आणि संदर्भ', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-२००७

८. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे -३०, आवृत्ती पहिली-१९८३

९. गाडगीळ गंगाधर, 'आजकालचे साहित्यिक', उत्कर्ष प्रकाशन, पुणे-३०, आवृत्ती पहिली-१९८०

१०. देव वीणा (संपादक), 'कादंबरीकार गो. नी. दांडेकर', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, आवृत्ती पहिली-१९८४

११. दळवी जयवंत,'साहित्यक गप्पा',(दहा साहित्यिकांशी) सन पब्लिकेशन्स, पुणे,आवृत्ती पहिली-१९८५

१२. यादव आनंद, 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे-३०, आवृत्ती पहिली-१९८५

१३. कोत्तापल्ले नागनाथ 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे-३०, आवृत्ती पहिली-१९८५

१४. वडेर प्रल्हाद, 'आशय आणि आविष्कार', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, आवृत्ती पहिली-१९८८

१५. पेंडसे श्री.ना., 'लेखक आणि माणूस, एक मित्र', मौज प्रकाशनगृह, मुंबई-०४, प्रथमावृत्ती-१९६७

१६. गाडगीळ गंगाधर, 'खडक आणि पाणी', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती-१९८३

१७. हातकणंगलेकर म.द., 'वाङ्मयीन शैली व तंत्र', अभिजात प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती-१९८१

१८. पारगावकर वि.शं. 'आस्वाद आणि समीक्षा', प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, पहिली आवृत्ती-१९८९

१९. शहा विभा, 'मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, सप्टेंबर-१९८८

२०. शेळके भास्कर (संपादक), 'ग्रंथवेध', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर-०९, पहिली आवृत्ती-२४ एप्रिल, २०१२

२१. बांदिवडेकर चंद्रकांत, 'देशीवाण', अक्षर प्रकाशन, मुंबई १६, पहिली आवृत्ती-मार्च, २००२

२२. मोहिते गणेश, 'समकालीन मराठी कादंबरी', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद- ०१, प्रथमावृत्ती-१७ सप्टेंबर, २०१३

२३. राजाध्यक्ष विजया, 'मराठी कादंबरी आस्वादयात्रा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई -२६, पहिली आवृत्ती -२००८

२४. फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०, पहिली आवृत्ती -१९८०

२५. सारडा शंकर, 'ग्रंथविशेष', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथम आवृत्ती- १९९१

२६. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास' (१९२०-१९४७), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, दुसरी आवृत्ती-ऑक्टोबर, १९९६

२७. हेर्लेकर सुलभा, 'आशा बगे : नवे अस्तित्व', कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती,- विजयादशमी,१९९६

२८. आठलेकर मंगला, 'महर्षी ते गौरी', राजहंस प्रकाशन, पुणे-१०, दुसरी आवृत्ती -२०००

२९. कुरुंदकर नरहर, 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी, पुणे-३०, पहिली आवृत्ती -१९९९

३०. संत जान्हवी, 'कादंबरी : एक वाङ्मय प्रकार', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती- जानेवारी २००१

३१. घाडगे मीरा, 'स्वामी : एक शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती-जानेवारी २००१

३२. माळी जी.पी., 'रणजित देसाई : जीवन आणि साहित्य', शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर- १२, प्रथमावृत्ती - ८ एप्रिल, २००१

३३. ढेरे अरुणा ( संपादन), 'स्त्री-लिखित मराठी कादंबरी', (१९५० ते २०१०) पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती -८ मार्च, २०१३

३४. पाटील तानाजी, 'मराठी कादंबरी : समीक्षा', डायमंड पब्लिकेशन्स पुणे-३०, प्रथमावृत्ती-२६ जानेवारी, २०११

३५. कांबळे शशिकला, 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-३० प्रथमावृत्ती - २६ जानेवारी, २०११

३६. पठारे रंगनाथ, 'आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर-०९, प्रथमावृत्ती - जानेवारी २०१४

३७. लिंबाळे शरणकुमार, 'साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे-३०, प्रथमावृत्ती - १५ ऑक्टोबर, २००५

३८. बळेल अनिल, 'ज्ञानपीठ त्रिमुर्ती', स्नेहल प्रकाशन, पुणे - ३०, प्रथमावृत्ती - १ ऑक्टोबर, २०११

३९. पाटील तानाजी, 'आनंद यादव : साहित्य आणि विचार', यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे-३०, प्रथमावृत्ती- १२ जानेवारी, २०१३

४०. पाटील विजय, 'बारोमास : एक अन्वयार्थ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०, प्रथमावृत्ती-२०११

४१. नाईक ज्ञानदा, 'व्यंकटेश माडगूळकर : लेखक आणि माणूस', अनुबंध प्रकाशन, पुणे-४३ प्रथमावृत्ती - ५ एप्रिल, २०१०

४२. तारळेकर मीरा, 'भारतीय साहित्याचे निर्माते : व्यंकटेश माडगूळकर', साहित्य अकादमी, नवी दिल्ली-०१, प्रथमावृत्ती -२०१०

४३. जोशी सुषमा, 'ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कादंबरीकार', अक्षता प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती- सप्टेंबर २०११

४४. हस्तक उषा, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद-१९९३

४५. खोले विलास(संपादक), 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती- १९९३

४६. कुलकर्णी गो.म., 'मराठी नाट्यसृष्टी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती- १९९३

४७. वैद्य माधवी, 'आरती प्रभूंची कविता', नीहारा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती-१९९०

४८. गोरे दादा, 'गोनीदांची ऐतिहासिक चरित्र -चरित्रात्मक कादंबरी', प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती-१९९१

४९. गोरे दादा, 'गोनीदांची प्रादेशिक कादंबरी', पैठणी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती -१९८७

५०. शेवडे इंदुमती, 'मराठी कथाः उगम आणि विकास', सोमैय्या प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती -१९७३

५१. जोशी सुधा, 'कथाः संकल्पना आणि समीक्षा', मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, आणि मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती-२०००

५२. ब्रह्मे मो.द. 'नटसम्राट : एक अभ्यास', व्हीनस प्रकाशन, पुणे - ३०, प्रथमावृत्ती - १९७३

५३. देशपांडे धों.वि., 'जी.ए. कुलकर्णींच्या कथा : एक अन्वयार्थ', मौज प्रकाशन गृह, मुंबई -०४, प्रथमावृत्ती -१९९०

५४. भोसले एस.एस., 'खांडेकर : व्यक्ती आणि साहित्य', मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७४

५५. घवी रवींद्र (संपादक), 'निवडक चिं.त्र्यं.खानोलकर', साहित्य अकादमी, दिल्ली - ०१, प्रथमावृत्ती -१९९२

५६. राजाध्यक्ष विजया, 'मर्ढेकरांची कविताः स्वरूप आणि संदर्भ', (खंड १ व २) मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९१

५७. भोसले एस.एस., 'साहित्यिक खांडेकर', अजब पुस्तकालय, कोल्हापूर प्रथमावृत्ती- १९८०

५८. परांजपे जयंत, 'श्री.ना.पेंडसे : हस्तलिखित आणि परिष्करणे', अमेय प्रकाशन, नागपूर , प्रथमावृत्ती - १९८२

५९. हातकणंगलेकर म. द. (संपादक), 'व्यंकटेश माडगूळकर : माणदेशी माणूस आणि कलावंत', शब्द प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती - २०००

६०. दडकर जया, 'वि.स.खांडेकर वाङ्मयसूची', देशमुख आणि कंपनी, पुणे - ३०, प्रथमावृत्ती-१९८४

६१. सरदेशमुख त्र्यं.वि., 'धुके आणि शिल्प', सन पब्लिकेशन्स, पुणे , प्रथमावृत्ती-१९८५

६२. सरदेशमुख त्र्यं.वि., 'प्रदेश साकल्याचा', श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती -१९७९

६३. नाईक सुवर्णा, 'शोध झाडाझडतीचा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे - ३०, प्रथमावृत्ती- २००३

६४. गाडगीळ गंगाधर, 'साहित्याचे मानदंड', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती- १९९६

६५. पवार गो.मा., 'साहित्यमूल्य आणि अभिरुची', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती- १९९४

६६. जोग रा.श्री., 'प्रदक्षिणा', खंड २रा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०

६७. ठाकूर रवींद्र , 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती- १५ मे २००७

६८. सानप किशोर, 'मराठी कादंबरीतील नैतिकता', बजाज पब्लिकेशन, अमरावती, प्रथम आवृत्ती- १९९८

६९. कोत्तापल्ले नागनाथ, 'साहित्य अवकाश', प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती-२००३

७०. सानप किशोर, 'मराठी कादंबरी : नवी दिशा', निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती-२००५
७१. बांदिवडेकर चंद्रकांत, 'साहित्याचे मर्म : शोध आणि बोध', पद्मगधा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती-२००८
७२. कोत्तापल्ले नागनाथ, 'साहित्याचा अन्वयार्थ', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती -२००८
७३. मेश्राम नंदा, 'दलित कादंबरी : स्वरूप आणि समीक्षा', डिंपल पब्लिकेशन्स, ठाणे, प्रथमावृत्ती -डिसेंबर २००६
७४. चौगुंले वि.शं., 'आस्वाद आणि आलेख', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली- २००१
७५. भिरुड प्रमिला, 'मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून- २००३
७६. देवधर विद्या, डोंगरे विनया, 'कादंबरी ', स्त्रीसाहित्याचा मागोवा, खंड-२, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ प्रथमावृत्ती-डिसेंबर २००२
७७. डहाके वसंत आबाजी, 'मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,प्रथमावृत्ती - २००५, (पुनर्मुद्रण २००८)
७८. मेश्राम केशव (संपादक), 'वाङ्मयीन प्रवृत्ती तत्त्वशोध', प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती -२००७
७९. कुलकर्णी द.भि., 'कादंबरी : स्वरूप व समीक्षा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती - एप्रिल २००३
८०. टापरे पंडित, 'कादंबरी संवाद', पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती -२००५
८१. भागवत विद्युत, 'स्त्री-प्रश्नांची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती - मार्च २००४
८२. रास्ते यशवंत श्रीपाद (संपादक),'व्यंकटेश माडगूळकर समग्र वाङ्मयसूची', उत्कर्ष प्रकाशन,पुणे-४
८३. त्र्यं.वि.सरदेशमुख, 'शारदीय चंद्रकला', मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती - १९९२
८४. गवस राजन, 'तिरकसपणातील सरळता', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
८५. ठाकूर रवींद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती- जुलै,१९९३
८६. ठाकूर रवींद्र, 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती -१९९३
८७. कानडजे एस.एम., 'आनंद यादव : साहित्य आणि जीवन', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे -०८, प्रथमावृत्ती- मार्च १९९५

८८. कुलकर्णी मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती -१९८४

८९. कुलकर्णी सुहास, मिलिंद चंपानेरकर (संपादक), 'असा घडला भारत' (१९४७-२०१२), रोहन प्रकाशन,
पुणे-३०, पहिली आवृत्ती - २६ जानेवारी,२०१३

९०. दीक्षित लीला, ढेरे अरूणा, खडपेकर विनया (संपादक), 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१', (इ.स.१८५० ते इ.स.१९५०) साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे-३०, प्रथमावृत्ती - डिसेंबर २००२

९१. दीक्षित लीला, ढेरे अरूणा, खडपेकर विनया (संपादक), 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड- २', (इ.स.१९५१ ते इ.स. २०००) साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे -३०, प्रथमावृत्ती - डिसेंबर २००२

९२. खांडगे मंदा, दीक्षित लीला, मंजिरी ताम्हनकर (संपादक), 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड-३', (लेखिका
परिचय आणि ग्रंथसूची , इ.स.१८५१ ते इ.स.२०००), साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे-३०, प्रथमावृत्ती -
डिसेंबर २००२

९३. खांडगे मंदा, गुंडी नीलिमा, देवधर विद्या, मिरजकर निशिकांत (संपादक), 'भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा (इ.स. १८५० ते २०००) खंड-२, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे ३०, प्रथम आवृत्ती- डिसेंबर २००७

९४. भेण्डे सुभाष(संपादक),'आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण शिल्पकार चरित्रकोश खंड-२' (साहित्य), साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था) मुंबई-२५,प्रथमावृत्ती-२०डिसेंबर, २००९

९५. गणोरकर प्रभा, टाकळकर उषा, डहाके वसंत आबाजी , दडकर दया, भटकळ सदानंद (संपादक), 'संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश',(१९२० पासून २००२ पर्यंतचा कालखंड) जी.आर.भटकळ फौंडेशन मुंबई-३४,पहिली आवृत्ती- फेब्रुवारी २००४

९६. मेहेंदळे उज्ज्वला (संपादक), 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन',मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई, नोव्हेंबर २००८

९७. जाधव वामन, 'ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन', सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती - २००७

९८. डहाके वसंत आबाजी, 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, १९९९.

९९. मुलाटे वासुदेव, 'नवे साहित्य नवे आकलन', मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-१९९६

१००. अत्रे त्रिं.ना., 'गावगाडा', वरदा बुक पुणे-३०, पुनर्मुद्रण १९९५

१०२. जाधव रा.ग. (संपादक), 'मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा : १९५० ते २०००' (भाग तिसरा) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे-३०, पहिली आवृत्ती-ऑक्टोबर, २०१०.

# ३. नियतकालिके

१. अनुभव (मासिक)
२. अनुष्टुभ (त्रैमासिक)
३. अक्षरवैदर्भी (मासिक)
४. परिवर्तनाचा वाटसरू (पाक्षिक)
५. प्रतिष्ठान
६. युगांतर
७. सर्वधारा (त्रैमासिक)
८. साधना
९. सत्यकथा
१०. समाज प्रबोधन पत्रिका
११. साप्ताहिक सकाळ
१२. सोबत
१३. आलोचना
१४. कवितारती
१५. नवभारत
१६. महाराष्ट्र साहित्य पत्रिका
१७. युगवाणी
१८. ललित
१९. साहित्यसूची
२०. लोकराज्य
२१. समकालीन भारतीय साहित्य
२२. अंतर्नाद
२३. उगवाई
२४. नीहार
२५. प्रिय रसिक
२६. अस्मितादर्श
२७. मराठी ग्रंथजगत